# अंबाबाईस सूर्यकिरणांचा अलंकार

## किरणोत्सव सोहळ्याची पर्वणी ; सलग दुसऱ्यादिवशी भाविकांतून समाधान



कोल्हापूर : किरणोत्सवाच्या दुसऱ्या दिवशीही पूर्ण क्षमतेने किरणोत्सव झाला. श्री अंबाबाई देवीच्या संपूण मूर्तीवर सूर्यकिरणे पोचली.
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३१ : श्री करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरातील बाष्पाचे प्रमाण अन् बाह्य वातावरणातील धुके कमी, आर्द्रता कमी, स्वच्छ आणि सुंदर वातावरण, निरभ्र आकाश आदी अनुकूल घटकांमुळे अंबाबाई देवीच्या उत्तरायण किरणोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सूर्यकिरणे देवीच्या संपूर्ण मूर्तीवर पोहोचली आणि मुकुटाकडून लुप्त झाली. विशेष म्हणजे, सूर्यकिरणांची तीव्रताही चांगली होती. यामुळे किरणोत्सव साकारला तसे भाविकांनी समाधान व्यक्त केले.**

सूर्याच्या किरणांनी मंदिरात प्रवेश केल्यानंतर देवीच्या कटांजल येथे सहा वाजून १७ मिनिटे ते सहा वाजून १९ मिनिटांपर्यंत ही किरणे १०० ते ११० सेकंद थांबली. ही किरणे चेहऱ्यावर ६.१७ मिनिटे तर किरिटापर्यंत ६.१९ मिनिटांपर्यंत स्थिर राहील. उद्या (शनिवारी) किरणोत्सव सोहळा होईल. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने नगारखाना, रामाचा पार, श्री सिद्धिविनायक मंदिर परिसरात तीन एलईडी स्क्रीन लावले होते. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी जिल्ह्यातून तसेच परगावांवरून भाविक आले होते. मंदिरात अतिगर्दी होऊ नये म्हणून एलईडी स्क्रीनच्या सोय केली होती. भाविकांनी तिन्ही ठिकाणी थांबून स्क्रीनवर किरणे कशी देवीपर्यंत जातात, ते पाहिले. स्क्रीनरून किरणोत्सवाचे मोबाईल रेकॉर्डिंगही अनेक भाविकांनी केले. संपूर्ण परिसर भाविकांनी फुलून गेला होता. किरण जसजशी देवीकडे सरकू लागली तसे परिसरात शांतता पसरली. संपूर्ण मंदिर परिसर धुपारती, उदबत्त्याच्या सुगंधाने भरून गेला होता.

अनेक भाविकांनी तीन दिवस सुरु असलेल्या किरणोत्सव पाहण्यासाठी कोल्हापूरमध्ये एक ते दोन दिवस आधी मुक्कामही केला होता. किरणोत्सव किती तारखेला होता, याचे नियोजन केले होते. अनेक भाविकांनी हा सोहळा कसा होता, याचे कुतूहल होते. किरणोत्सव झाल्यानंतर भाविकांनी देवीचे दर्शन घेतले.

### असा झाला किरणांचा प्रवास

| | |
|---|---|
| महाद्वार रोड मेन गेट | ५.३३ |
| गरुड मंडप | ५.४१ |
| गणपती मंदिर समोरील कासव चौक | ६.०० |
| पितळी उंबरा | ६.०५ |
| गाभाऱ्याची पायरी | ६.११ |
| कटांजल | ६.१२ |
| चरण स्पर्श कंबर | ६.१४ |
| छाती | ६.१६ |
| गळा | ६.१७ |
| चेहरा | ६.१७ |
| किरीट | ६.१७ |
| पूर्ण किरणोत्सव | ६.१८ |

**किरणांची तीव्रता मोजण्यासाठी लक्स मीटर उपकरण वापरले जाते. लक्स मीटर म्हणजे, एका मेणबत्तीने एका स्क्वेअर मीटर अंतरावर दिलेला प्रकाश म्हणजे एक लक्स मीटर असे म्हणतात. किरणांची दिशा पाहण्यासाठी मॅग्नेटोमीटर उपकरण वापरले जाते. किरणांच्या मार्गावर येणाऱ्या अडथळ्यांची पाहणी केली होती.**
**- प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर,** किरणोत्सव अभ्यासक

कोल्हापूर । शनिवार, १ फेब्रुवारी २०२०

# दुसऱ्या दिवशीही किरणोत्सव पूर्ण

अर्जुन टाकळकर



उत्तरायण किरणोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी मावळतीची किरणे देवीच्या कमरेला स्पर्श करत मुखापर्यंत पोहोचली.

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील उत्तरायण किरणोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी मावळतीची किरणे देवीच्या कमरेला स्पर्श करत मुखापर्यंत पोहोचली. सायंकाळी सव्वा सहा वाजता देवीच्या कमरेला किरणांचा स्पर्श झाला. शुक्रवार असल्याने किरणोत्सवाचे दर्शन घेण्याबरोबरच स्थानिक भाविकांसह परगावच्या भाविकांनीही गर्दी केली होती. भाविकांच्या सुविधेसाठी मंदिराच्या आवारात स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली होती.

सायंकाळी साडेपाच वाजता किरणे महाद्वारातून मंदिरात आली. पाच वाजून ४१ मिनिटांनी किरणांनी गरूड मंडपात प्रवेश केला. अत्यंत प्रखर किरणे असल्याने किरणोत्सव पूर्ण होणार असे चित्र दिसत होते. सहा वाजता किरणांचा कासव चौकात प्रवेश झाला. यावेळी दुतर्फा थांबलेल्या भाविकांचा काहीवेळ किरणांमध्ये अडथळा झाल्याने गोंधळ झाला. पितळी उंबरा ओलांडून किरणे पेटीचौकात येताच पेटीचौक व गर्भकुडीतील दिवे मालवण्यात आले. सहा वाजून १२ मिनिटांनी किरणे गाभाऱ्याची पायरी ओलांडून देवीच्या

## मावळतीच्या किरणांनी उजळला गाभारा

चरणांच्या दिशेने सरकली. तर पुढच्या मिनिटाला चरणस्पर्श करत देवीच्या कमरेपर्यंत पोहोचली. प्रखरता व वेग चांगला असल्याने हा सोहळा भाविकांच्या नजरेचे पारणे फेडणारा होता. दुसऱ्या दिवशी किरणांचा देवीच्या कमरेला स्पर्श

होणे आवश्यक असतो. त्यामुळे किरणांनी देवीच्या कमरेला स्पर्श करताच उपस्थित भाविकांनी टाळ्या वाजवत जयअंबे असा जयघोष केला. यावेळी किरणांची प्रखरता टिकून होती व किरणे मुखाच्या दिशेने वर सरकू लागल्याने भाविक बसून राहीले. सोनेरी झाक असलेल्या किरणांनी देवीचे मुखकमल उजळून गेल्यानंतरही एक मिनिटांपर्यंत किरणे स्थिर होती. यानंतर देवीची आरती करण्यात आली. भाविकांनी [illegible] चौकातील घंटानाद केला.

### स्क्रिनवरही किरणोत्सवाचा आनंद

मंदिरातील गणपती चौकापासून ते पेटीचौकापर्यंत भाविकांची गर्दी झाली होती. तसेच संशोधक, अभ्यासक, विद्यार्थीही किरणोत्सवाच्या नोंदी करण्यासाठी मंदिरात होते. अधिकाधिक भाविकांना किरणोत्सव सोहळ्याचा आनंद घेता यावा यासाठी मंदिराच्या आवारात स्क्रिनची सुविधा करण्यात आली होती. या स्क्रिनवरही शेकडो भाविकांनी किरणोत्सव पाहिला.

### किरणोत्सव सोहळ्याला पर्यटनकक्षेत आणावे

विविध शहरांमधील वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी पर्यटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जातात. याच धर्तीवर कोल्हापुरातील अंबाबाई मंदिरात होणाऱ्या किरणोत्सव सोहळ्याचे पर्यटनाच्यादृष्टीने महत्त्व वाढवले पाहिजे. वर्षातून दोन वेळा सहा दिवस होणारा किरणोत्सव सोहळा पाहण्यासाठी पर्यटक यावेत यासाठी जिल्हा प्रशासन, महापालिका, पर्यटन विकास कार्यालय व देवस्थान समिती यांच्यावतीने पुढाकार घेण्याची गरज आहे

शनिवार, १ फेब्रुवारी २०२०

# यशस्वी किरणोत्सवाने करवीरवासीयांत चैतन्य..!

## अतिक्रमणे हटवली : गर्दीवरील नियंत्रणाचा परिणाम

कोल्हापूर / प्रतिनिधी :


महाद्वार चौकातील अतिक्रमणांवर केलेली कारवाई, अंबाबाई गाभाऱ्यातील गर्दीवर आणलेले नियंत्रण आणि अभ्यासकांच्या सूचनांचे काटेकोर पालन या सर्व गोष्टींमुळे गेली अनेक वर्षे हुलकावणी देणारा अंबाबाई मंदिरातील किरणोत्सव सोहळा पुन्हा यशस्वी होत आहे. देवस्थान समितीकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचेही स्वागत भाविकांकडून केले जात आहे.

वास्तुकलेचा अजोड नमुना असलेल्या अंबाबाई मंदिरात वर्षातून दोन वेळा होणारा किरणोत्सव सोहळा हा भाविक आणि वास्तु अभ्यासकांसाठी नेहमीच पर्वणी ठरतो आहे. मावळतीच्या सूर्याची किरणे थेट अंबाबाईच्या मूर्तीवर पडतात. ते विलोभनीय दृश्य डोळ्यात साठवण्यासाठी अनेकजण मुद्दाम मंदिराला भेट देत असतात; परंतु गेल्या काही वर्षांपासून अंबाबाई मंदिर परिसरात निर्माण झालेले इमारतींचे अडथळे, वाढते प्रदूषण, मंदिरातील वाढती आर्द्रता या कारणांमुळे या किरणोत्सवात मोठे अडथळे निर्माण होत होते.

१५-२० वर्षांपूर्वी पूर्ण क्षमतेने होणाऱ्या किरणोत्सव मार्गावर गेल्या काही वर्षांत अडथळे निर्माण होत होते. किरणोत्सव पुन्हा यशस्वी करण्यासाठी समितीमार्फत अभ्यास करण्यात आला. त्याअंतर्गत खगोल अभ्यासकांनी केलेल्या सूचना, प्रशासनाने दाखवलेली सतर्कता आणि देवस्थान समितीचा पुढाकार या कारणांमुळे भाविकांना पुन्हा पूर्ण क्षमतेच्या किरणोत्सवाची प्रचिती येत आहे. गेल्या वर्षी देवस्थान समितीने पुढाकार घेऊन किरणोत्सव काळामध्ये मंदिराच्या गाभाऱ्यातील गर्दी कमी केली. किरणांचे परावर्तित होणे थांबवण्यासाठी कापडाचा वापर केला. महापालिकेकडूनही महाद्वार रोड तसेच ताराबाई रोडवरील अतिक्रमणे काढण्यात आली. या सर्व उपाययोजनांमुळे किरणोत्सव पुन्हा यशस्वी झाला. किरणोत्सवातील अडथळ्यांची कारणे शोधण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या खगोलशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी केलेला अभ्यासही याकामी महत्त्वाचा ठरला. त्यांनी काढलेले निष्कर्षही फायदेशीर ठरले.

### प्रदूषणावर नियंत्रण हवे

किरणोत्सव पूर्ण क्षमतेने न होण्याच्या विविध कारणांमध्ये हवेतील धूलिकण तसेच वाढते प्रदूषण हे कारणही मुख्य आहे. गेल्या काही वर्षांत शहरातील वाढते प्रदूषणही किरणांची तीव्रता कमी होण्यास कारणीभूत ठरत आहे. किरणोत्सव काळात अंबाबाई मंदिर परिसरातील वाहतूक मार्गात बदल करणे, परिसरातील प्रदूषण रोखण्यासाठी उपाय करणे, या गोष्टीही करणे आवश्यक आहेत.



उत्तरायण-दक्षिणायन काळातील किरणोत्सव पूर्वी तीन दिवसांचा होता, परंतु आता पाच दिवस किरणोत्सव होत आहे. या सर्व तारखांचा अभ्यास करून योग्य तो निष्कर्ष काढणार आहे.

- प्रा. मिलिंद कारंजकर, विवेकानंद महाविद्यालय



महाद्वार चौकातील अतिक्रमणे तसेच मंदिरातील आर्द्रता कमी करण्यासाठी देवस्थान समितीने पुढाकार घेतला. या सर्वांमुळेच पुन्हा पूर्ण क्षमतेने किरणोत्सव पाहता येत आहे. भाविकांना एलईडी स्क्रीनद्वारे किरणोत्सवाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

- महेश जाधव, अध्यक्ष, देवस्थान समिती





# अंबाबाईचे प्रभामंडळ झळाळले

## किरणोत्सव सोहळा; अंबामातेचा जयघोष; किरणांची तीव्रता अधिक

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १ : अखंड यांत्रिक जगताचा जो, सूर्यवरती तथा लागुनी, दाहकत्वाची शाल टाकतो, नम्र होतसे अंबाचरणी होत सूर्यनारायणाने आज अपेक्षेप्रमाणे श्री करवीर निवासिनी अंबाबाई देवीपर्यंतचा प्रवास पूर्ण केला. विशेष असे की, कालच्यापेक्षा (ता. ३१) सूर्यकिरणांची तीव्रता आज जास्त होती. जेव्हा सूर्यकिरणांनी देवीला चरणस्पर्श केला तेव्हा सुवर्णांच्या कणांप्रमाणे प्रभामंडळ झळाळून गेले. आज सूर्यकिरणे चेहऱ्याकडून डावीला झुकतात. ही किरणे चेहऱ्यापर्यंत गेली अन् डावीकडे लुप्त झाली. किरणोत्सव झाल्यानंतर भाविकांनी अंबामाते की जय, असा जयघोष केला. यानंतर घंटानाद होऊन आरती झाली.**

आजचे वातावरणही स्वच्छ होते. सकाळ-संध्याकाळ धुके होते; पण सूक्ष्म धुक्याची चादर ही सूर्यकिरणांच्या वर होती. ही किरणे अलगदपणे महाद्वारातून आत आली. हळूहळू किरणे देवीच्या मूर्तीपर्यंत गेली.

याबाबत किरणोत्सव अभ्यासक प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर म्हणाले, "किरणांची दिशा कशी बदलते, ते पाहण्यासाठी आम्ही दिशादर्शक उपकरण वापरले. तसेच हवेतील आर्द्रता मोजण्यासाठी एजी लॉग (तापमान/आर्द्रता) तर वाऱ्याची दिशा पाहण्यासाठी एरोमीटर (ॲनिमोमीटर), टेम्परेजर सेन्सर आदी उपकरणे वापरली. या उपकरणांतून किरणे, हवा, आर्द्रता, तापमान, धुळीकण, धुके आदींच्या अचूक नोंदणी होतात. आज ६ वाजून १८ मिनिटांनी सूर्यकिरणे देवीच्या चेहऱ्यापर्यंत आली."

### सूर्यकिरणांचा प्रवास असा झाला

| | |
|---|---|
| महाद्वार मेन गेट | ५.१८ वाजता |
| गरूड मंडप मेन | ५.३९ वाजता |
| गरूड मंडप जिना | ५.४४ वाजता |
| गणपती पाठीमागील बाजूस | ५.५५ वाजता |
| कासव चौक | ६.०२ वाजता |
| पितळी उंबरा | ६.०५ वाजता |
| पहिली पायरी | ६.१० वाजता |
| दुसरी पायरी | ६.११ वाजता |
| कटांजल | ६.१५ वाजता |
| चरण स्पर्श | ६.१५ वाजता |
| कंबर | ६.१६ वाजता |
| छाती | ६.१७ वाजता |
| चेहरा | ६.१८ वाजता |
| गाभाऱ्यातील तापमान | ३२.५ अंश |

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने नगरखाना, रामाचा पार, श्री सिद्धिविनायक परिसरात लावलेल्या एलईडी स्क्रीनवर हा अनुपम सोहळा भाविकांना पाहता आला. जशी किरणे गरुड मंडपातून पुढे जाऊ लागली तसे अनेकांनी मोबाईल कॅमेरा 'ऑन' केले. काहींनी तर हे क्षण मित्र-मैत्रणी, नातेवाईक, सहृदांना पाठविले. उद्याही (ता. २) किरणोत्सव सोहळा होईल.



**कोल्हापूर :** श्री करवीर निवासिनी अंबाबाई देवीपर्यंतचा प्रवास सूर्यकिरणांनी पूर्ण केला.

सोमवार, ३ फेब्रुवारी २०२०

# मावळतीची किरणे देवीच्या गुडघ्यापर्यंतच

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## तज्ज्ञ आज करणार किरणांचा अभ्यास

करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील उत्तरायण किरणोत्सवाच्या चौथ्या दिवशी रविवारी मावळतीच्या सूर्याची किरणे अंबाबाई मूर्तीच्या गुडघ्यापर्यंतच पोहोचली. किरणोत्सवाच्या नियोजित क्रमानुसार रविवारी किरणे देवीच्या मुखापर्यंत जाणे अपेक्षित होते. मात्र सायंकाळी सहा वाजून १७ मिनिटांनी अंबाबाई मुर्तीच्या गुडघ्यापर्यंत पोहोचून डावीकडे लुप्त झाली. दरम्यान, सोमवारी देवस्थान समिती आणि विवेकानंद महाविद्यालयाच्या खगोलशास्त्र विभागातर्फे गाभाऱ्यातील किरणांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

३१ जानेवारीपासून मंदिरात उत्तरायण किरणोत्सव सोहळा सुरू आहे. पहिल्या दोन दिवशी किरणोत्सव सोहळा पूर्ण क्षमतेने झाल्यामुळे रविवारी हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती. रविवारी किरणांची प्रखरता कमी होती. गरुड मंडपामध्ये पाच वाजून ४२ मिनिटांनी पोहोचलेली किरणे अर्ध्या तासाने कटांजलपर्यंत आली. ६ वाजून १६ मिनिटांनी किरणांनी देवीला चरणस्पर्श केला. यावेळी गाभाऱ्यातील दिवे मालवण्यात आले. त्यानंतर पुढच्या एक मिनिटात किरणे मूर्तीच्या वरच्या दिशेने सरकली मात्र काही वेळातच ती लुप्त झाली.

कोल्हापूर, सोमवार,
३ फेब्रुवारी २०२०

# किरणोत्सवाची आज अंबाबाई मंदिरात सांगता

## चौथ्या दिवशी किरणे मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत

**कोल्हापूर, ता. २ : श्री अंबाबाई मंदिरातील उत्तरायण किरणोत्सव सोहळ्याच्या चौथ्या दिवशी आज सायंकाळी सहा वाजून अठरा मिनिटांनी मावळतीची सूर्यकिरणे मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत पोचली आणि डावीकडे लुप्त झाली. उत्तरायण किरणोत्सव सोहळा दोन दिवस अलीकडे होत असल्याचे आता स्पष्ट होत असून त्यादृष्टीने आता आणखी आवश्यक अभ्यासावर भर दिला जाणार असल्याचे देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर यांनी सांगितले.**

दरम्यान, उत्तरायण किरणोत्सवातील पहिल्या तीन दिवशी मावळतीची सूर्यकिरणे देवीच्या मुखापर्यंत पोचली होती.

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वतीने गेल्या वर्षीपासून वर्षातील दोन्ही किरणोत्सव सोहळे पाच दिवसांचे करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार नऊ, दहा आणि अकरा नोव्हेंबरला होणारा दक्षिणायनातील सोहळा आठ ते बारा नोव्हेंबर आणि ३१ जानेवारी व एक, दोन फेब्रुवारीला होणारा उत्तरायणातील सोहळा ३०, ३१ जानेवारी आणि एक, दोन, तीन फेब्रुवारी असा साजरा झाला. या दोन्ही सोहळ्यातील सर्व नोंदी किरणोत्सव अभ्यास समितीने ठेवल्या आहेत.

**मंदिरातील विद्युत जोडण्या अंडरग्राऊंड**

अंबाबाई मंदिर परिसरातील सर्व विद्युत जोडण्या आता अंडरग्राऊंड केल्या जाणार असून भाविकांच्या सुरक्षिततेसाठीची उपाययोजना म्हणून लवकरच त्याची कार्यवाही केली जाणार आहे. दरम्यान, अंबाबाई आणि जोतिबा मंदिरांचे पहिल्यांदाच स्ट्रक्चरल ऑडिटची प्रक्रियाही अंतिम टप्प्यात आली असून लवकरच ऑडिटला प्रारंभ होणार आहे. मंदिराच्या शिखरांपासून ते मंदिर परिसरातील सर्व मूर्ती आणि छोट्या मंदिरांचेही ऑडिट केले जाणार आहे.



**कोल्हापूर : अंबाबाई मंदिरातील किरणोत्सव सोहळ्याच्या चौथ्या दिवशी रविवारी मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत मावळतीची सूर्यकिरणे पोचली.**

मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२०

# उत्तरायणातील किरणोत्सव दोन दिवस आधी

## देवस्थान समितीच्या अभ्यासातून स्पष्ट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या उत्तरायणातील किरणोत्सवाच्या पाचव्या दिवशी सूर्यकिरणे देवीच्या चरणापर्यंत पोहोचून डावीकडे लुप्त झाली. किरणोत्सवाच्या ठरलेल्या तारखेच्या आधी दोन दिवस उत्तरायणातील किरणोत्सव होत असून दक्षिणायनातील किरणोत्सव दोन दिवस उशिरा होत असल्याचे देवस्थान समितीच्या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

सोमवारी सायंकाळीही मावळतीची सूर्यकिरणे तीव्र होती; पण काही वेळाने किरणांची तीव्रता कमी झाल्याने किरणे देवीच्या चरणापर्यंतच पोहोचू शकली. दोन वर्षांपूर्वी किरणोत्सवाच्या तारखांबाबत तज्ज्ञांनी शंका व्यक्त केल्याने देवस्थान समिती अध्यक्ष महेश जाधव यांनी किरणोत्सवाच्या ठरलेल्या तारखांच्या आधी एक दिवस आणि नंतर एक दिवस असा पाच दिवस किरणोत्सव अभ्यास केला जाईल, असे सांगितले होते. त्यानुसार देवस्थान समिती आणि विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून अभ्यास सुरू होता. दरम्यानच्या काळात देवस्थान समितीने पुढाकार घेऊन किरणोत्सव मार्गातील अडथळेही दूर केले. त्यामुळे यावर्षी नोव्हेंबरमध्ये दि. ९, १० व ११ या तारखेला होणारा किरणोत्सव ११ व १२ या तारखांना पूर्णक्षमतेने झाला. तर उत्तरायणातील किरणोत्सव ३१ जानेवारी, १ व २ फेब्रुवारी ऐवजी २९, ३० व ३१ जानेवारी या दिवशी पूर्ण क्षमतेने झाला. त्यामुळे दक्षिणायनातील किरणोत्सव दोन दिवस उशिरा व उत्तरायणातील किरणोत्सव दोन दिवस आधी होत असल्याचे स्पष्ट झाल्याचे विवेकानंद महाविद्यालयाचे प्रा. मिलिंद कारंजकर यांनी सांगितले. तरीही आजअखेर किरणोत्सवाचा अभ्यास करण्यात आला.


मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२०

# ढगाळ वातावरणामुळे सूर्यकिरणे चाचणीत अडथळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान आणि विवेकानंद महाविद्यालय खगोलशास्त्र विभागामार्फत अंबाबाई मंदिरात सोमवारी सूर्यकिरणांच्या तीव्रतेचा अभ्यास करण्यात आला. मात्र यावेळी ढगाळ वातावरणामुळे चाचणीत अडथळा निर्माण झाला. अंबाबाई मंदिरातील उत्तरायण किरणोत्सव सोहळा नुकताच संपन्न झाला. या पार्श्वभूमीवर सूर्यकिरणांच्या तीव्रतेची चाचणी घेतली. खगोलशास्त्र अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार पुढील किरणोस्तव सोहळा ८ ते १२ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

या चाचणीत ५ वाजून ४३ मिनिटांपर्यंत गरुड मंडपात पूर्ण क्षमतेने किरणांनी प्रवेश केला. ६ वाजून ०२ मिनिटांनी कासव चौकात किरणांनी प्रवेश केला. ६ वाजून ०९ मिनिटांनी गाभाऱ्यातील पहिल्या पायरीपर्यंत किरणांची तीव्रता जास्त होती. ६ वाजून १५ मिनीटांनी किरणे देवीच्या कटांजलापर्यंत विसावली. ढगाळ वातावरणामुळे किरणे मंदगतीने डाव्या बाजूला लुप्त झाली.


संग्रहित

२९, ३०, ३१ जानेवारी, १ आणि २ फेब्रुवारी रोजी उत्तरायण किरणोत्सवात किरणोस्तव पूर्ण क्षमतेने झाला. अंबाबाई देवीच्या मुकुटापर्यत सूर्यकिरणे पोहोचली. २ फेब्रुवारीला किरणोस्तव सोहळ्याची सांगता झाली होती.

# किरणोत्सवाच्या तारखा बदलणार ?

## वैशिष्ट्यपूर्ण सोहळा ; आणखी दोन किरणोत्सव सोहळ्यांचा होणार परिपूर्ण अभ्यास



कोल्हापूर : किरणोत्सव सोहळ्याचे संग्रहित छायाचित्र.

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ५ : करवीरनिवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील वैशिष्ट्यपूर्ण किरणोत्सव सोहळ्याच्या तारखा बदलत असल्याचे स्पष्ट होत असले, तरी आणखी परिपूर्ण अभ्यासानंतरच याबाबतची पुढील कार्यवाही होणार आहे. दक्षिणायनातील किरणोत्सव नियोजित तारखांच्या दोन दिवस पुढे, तर उत्तरायनातील किरणोत्सव दोन दिवस अगोदर होत असल्याचे आजवरचा अभ्यास आणि नोंदीवरून स्पष्ट झाले आहे; मात्र आगामी नोव्हेंबर आणि जानेवारी-फेब्रुवारी २०२१ या दोन सोहळ्यांतील नोंदी घेऊनच पुढे तारखांबाबतचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.**

अंबाबाई मंदिरात ९, १० व ११ नोव्हेंबर आणि ३१ जानेवारी, १ व २ फेब्रुवारी असा वर्षातून दोनदा किरणोत्सवाचा सोहळा होतो.

मात्र, किरणोत्सव मार्गातील अडथळ्यांमुळे अनेक वर्षे किरणोत्सवाचा सोहळा पूर्ण क्षमतेने झाला नाही. या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने किरणोत्सव अभ्यास समिती नेमून त्यात तज्ज्ञांचा सहभाग घेतला आहे. या समितीने किरणोत्सवाच्या नोंदी ठेवल्या आहेत. या पार्श्वभूमीवर देवस्थान समितीने जानेवारी २०१९ पासून पाच दिवसांच्या किरणोत्सवाला प्रारंभ केला. दरम्यान, गेल्या तीन किरणोत्सवांच्या अगोदर व पुढील काही दिवसांच्या नोंदी ढगाळ हवामानामुळे घेता आल्या नाहीत. या नोंदी पुढील दोन किरणोत्सवात घेतल्या जाणार असल्याचे प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर यांनी सांगितले.

### दोन वर्षांपासून प्रयत्न

किरणोत्सव सोहळ्यात सूर्याची मावळतीची किरणे थेट देवीच्या मूर्तीवर पडतात. किरणोत्सव सोहळा मंदिराच्या स्थापत्यशास्त्र आणि खगोलशास्त्राचा उत्तम नमुना आहे; परंतु या किरणोत्सवाच्या मार्गावर बांधकामे झाल्याने काही वर्षात पूर्णपणे किरणोत्सव झालाच नाही. मंदिरातील किरणोत्सवात अडथळे येतात, त्याचा शास्त्रीय अभ्यास झाला. त्यासाठी कोणता अडथळा किती प्रमाणात आहे, याचीही मांडणी केली. ही मांडणी करून अनेक वर्षे होऊनही अडथळे इंचानेही कमी झाले नाहीत. किरणोत्सव नीटपणे होऊ शकत नसल्याने भाविक आणि अभ्यासकांतून नाराजी व्यक्त व्हायची. ज्येष्ठ शास्त्रज्ञ आर. व्ही. भोसले यांनीही सुरुवातीस किरणोत्सवात इमारतींचे अडथळे आणि हवेच्या प्रदूषणाचाही मुद्दा मांडला होता. या साऱ्या पार्श्वभूमीवर दोन वर्षांपासून किरणोत्सव समिती, देवस्थान समिती आणि महापालिकेच्या माध्यमातून अडथळे काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले. त्यामुळे आता किरणोत्सव पूर्ण क्षमतेने होत असल्याचे सकारात्मक चित्र अनुभवायला मिळते आहे.

### वेळ आणखी वाढवणे शक्य

अत्याधुनिक टेलिस्कोपच्या साहाय्याने किरणोत्सव मार्गातील सर्व अडथळ्यांच्या नोंदी घेऊन ते काढण्यात आले. त्यामुळे आजअखेर झालेले तिन्ही किरणोत्सव सोहळे पूर्ण क्षमतेने झाले. त्यातूनही नियोजित तारखांच्या दोन दिवस मागे व पुढे किरणोत्सव पूर्ण क्षमतेने होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे किरणोत्सवाची वेळ आणखी वाढवता येणे शक्य आहे.

गुरुवार, ३० जानेवारी २०२०

# अंबाबाई मंदिरात आजपासून किरणोत्सव

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे किरणोत्सव होणार आहे. गुरुवार दि. ३० जानेवारी रोजी किरणोत्सवास प्रारंभ होईल. सोमवार दि. ३ फेब्रुवारीअखेर दररोज सायंकाळी हा किरणोत्सव पाहण्याची संधी कोल्हापूरकरांना मिळणार आहे. अंबाबाई मंदिरात दक्षिणायन व उत्तरायण असा वर्षातून दोनवेळा किरणोत्सव होत असतो. नोव्हेंबर महिन्यात उत्तरायण तर जानेवारी महिन्याच्या शेवटी व फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला दक्षिणायन किरणोत्सव होतो. प्रतिवर्षी तीन दिवसांचा किरणोत्सव होत होता. मात्र, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने तो गेल्या काही वर्षांपासून पाच दिवसांचा केला आहे. किरणोत्साच्या पहिल्या दिवशी मावळतीची सूर्यकिरणे देवीच्या चरणावर पडतात, तर पुढील चार दिवसांत टप्प्याटप्प्याने संपूर्ण मूर्तीवर पडतात. ढगाळ वातावरणामुळे किरणोत्सवात अडथळा निर्माण होऊ शकतो.



कोल्हापूर : किरणोत्सवाच्या पूर्वसंध्येला सूर्यकिरणे मूर्तीच्या चेहऱ्यापर्यंत पोहोचली.

(छाया : तय्यब अली)

## पूर्वसंध्येला किरणोत्सव...

दरम्यान, किरणोत्सवाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच बुधवारी सायंकाळी मावळतीची सूर्यकिरणे मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत पोहोचली. यानंतर किरणे मूर्तीच्या पायापासून चेहऱ्यापर्यंत पोहोचल्याची माहिती खगोलशास्त्र अभ्यासक डॉ. मिलिंद कारंजकर यांनी दिली.

कोल्हापूर, सोमवार, ३ फेब्रुवारी २०२०

# सूर्यकिरणे देवीच्या गुडघ्यापर्यंत

## किरणोत्सवाच्या चौथ्या दिवशीही भाविकांची गर्दी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

किरणोत्सवाच्या चौथ्या दिवशी सूर्यकिरणे करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या गुडघ्यापर्यंत पोहोचली. किरणोत्सवाचा सोहळा पाहण्यासाठी रविवारी भाविकांनी मंदिरात गर्दी केली होती.

दुपारनंतर वातावरणा काहीसे ढगाळ झाले होते. सूर्यकिरणे मात्र प्रखर होती व ती गरुड मंडपामध्ये ५.४२ वाजता पोहोचली. कासव चौकात ६ वाजून २ मिनिटांनी किरणांनी प्रवेश केला. यानंतर पहिल्या पायरीजवळ किरणे ६ वाजून ९ मिनिटांनी पोहचली. ६.१६ वाजता किरणांनी मूर्तीला चरणस्पर्श केला. यानंतर किरणे ६.१७ वाजता गुडघ्यापर्यंत पोहोचून डावीकडे लुप्त झाली. किरणोत्सव सोहळ्यासाठी आजही मंदिरात भाविकांची गर्दी होती. परजिल्ह्यातून आलेल्या भाविकांनीही या सोहळ्याचा आनंद घेतला. सोमवारी देवस्थान समिती आणि विवेकानंद महाविद्यालयाच्या खगोलशास्त्र विभागातर्फे गाभाऱ्यातील किरणांचा अभ्यास करण्यात येणार आहे.



**कोल्हापूर : किरणोत्सवाच्या चौथ्या दिवशी रविवारी सूर्यकिरणे अंबाबाईच्या गुडघ्यापर्यंत पोहचली. (छाया : नाज ट्रेनर)**

गुरुवार, ३० जानेवारी २०२० ३



**कोल्हापूर : श्री अंबाबाई मंदिरातील किरणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी मावळतीच्या सूर्यकिरणांची पाहणी झाली. यावेळी ही सूर्यकिरणे देवीच्या मुखापर्यंत पोचली.**

# अंबाबाई मंदिरात किरणोत्सव

## आज प्रारंभ; पूर्वसंध्येलाच किरणांचा मुखकमलावर अभिषेक

**कोल्हापूर, ता. २९ :** करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात उद्या (ता. ३०) पासून किरणोत्सवाला सुरवात होणार आहे. त्याच्या तयारीला आजपासून प्रारंभ झाला. सायंकाळी मावळतीच्या सूर्यकिरणांची पाहणी केली असता किरणांनी देवीच्या मुखकमलावर अभिषेक केला. त्यानंतर श्रीपूजक शरद मुनीश्वर यांनी आरती केली. दरम्यान, किरणांची तीव्रता अधिक असून, पुढे पाच दिवस होणारा सोहळा पूर्ण क्षमतेने होईल, असा विश्वास यावेळी देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, किरणोत्सव अभ्यासक प्रा. मिलिंद कारंजकर यांनी व्यक्त केला.

मंदिरात होणारे दोन्ही किरणोत्सव सोहळे गेल्या जानेवारीपासून पाच दिवसांचे होणार असल्याचे देवस्थान समितीने जाहीर केले होते. त्यानुसार आता पाच दिवसांच्या सोहळ्य आयोजन केले जाते. ८ ते १२ नोव्हे या दरम्यान किरणोत्सव झाला. (ता.३०) पासून ३ फेब्रुवारीपर्यंत सोहळा होणार आहे.

काही वर्षांपासून किरणोत्सवा तारखा बदलल्या आहेत का, य अभ्यास सुरू झाला. या पार्श्वभूम पाच दिवसांचा किरणोत्सव सो सुरू झाला आहे.

कोल्हापूर, गुरुवार, दि. ३० जानेवारी २०२०



कोल्हापुरातील श्री अंबाबाईच्या किरणोत्सवाच्या पूर्वसंध्येलाच (बुधवारी) सायंकाळी ६ वाजून १७ मिनिटांनी सूर्यकिरणे देवीच्या चेहऱ्यापर्यंत पोहोचली.

# पूर्वसंध्येलाच सूर्यकिरणे अंबाबाईच्या चेहऱ्यावर

## किरणोत्सव : पाच दिवस होणार सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** करवीरनिवासिनी श्री अंबाबाईच्या दक्षिणाय किरणोत्सवाच्या पूर्वसंध्येलाच (बुधवारी) सायंकाळी ६ वाजून १७ मिनिटांनी सूर्यकिरणे थेट अंबाबाईच्या चेहऱ्यावर पडली. स्वच्छ वातावरणामुळे किरणे देवीच्या किरीटापर्यंत येऊन लुप्त झाली. त्यानंतर भाविकांनी 'अंबा माता की जय'चा गजर केला.

श्री अंबाबाईच्या दक्षिणायन किरणोत्सवाला आज, गुरुवारपासून प्रारंभ होत आहे. पूर्वी तीन दिवस चालणारा हा सोहळा आता पाच दिवसांचा झाला आहे. त्यानिमित्त किरणोत्सवाच्या पूर्वसंध्येला किरणांची दिशा, वातावरण, प्रदूषण, ढग, धुके याचा अभ्यास करण्यासाठी सायंकाळी मंदिरातील सर्व दिवे मालवून किरणांच्या प्रवासाची चाचणी घेण्यात आली आणि आश्चर्यकारकरीत्या स्वच्छ वातावरण व योग्य दिशेमुळे किरणे थेट देवीच्या चेहऱ्यापर्यंत पोहोचून व काही क्षण स्थिरावली.

सायंकाळी ५ वाजून ५० मिनिटांनी सूर्यकिरणे महाद्वारातून मंदिरात आली. त्यानंतर गरुड मंडप, कासव चौक, पितळी उंबरा, गाभाऱ्यातील पहिली पायरी, दुसरी पायरी, तिसरी पायरी, मूर्तीचा चरणस्पर्श असा प्रवास करत सायंकाळी ६ वाजून १७ मिनिटांनी सूर्यकिरणे अंबाबाईच्या चेहऱ्यावर आली. किरीटापर्यंतचा प्रवास करुन किरणे लुप्त झाली. त्यानंतर परंपरेप्रमाणे देवीची आरती करण्यात आली. प्रा. मिलिंद कारंजकर यांनी किरणोत्सवाची चाचणी घेतली.

### किरणांचा प्रवास असा

- महाद्वार : ५ वाजून ५० मिनिटे
- गरुड मंडप मागील बाजू : ५ वाजून ५४ मिनिटे
- गरुड मंडप चबुतरा : ५ वा. ५५ मिनिटे
- गणपती मंदिर मागील बाजू : ५ वाजून ५६ मिनिटे
- गणपती मंदिर समोरील बाजू : ५ वाजून ५९ मिनिटे
- कासव चौक : ६ वाजून ४ मिनिटे
- अंबाबाईच्या चेहऱ्यावर : ६ वाजून १७ मिनिटे

विद्या प्रबोधिनी
राज्यसेवा-2020
मोफत कार्यशाळा
CSAT- उतारे व निर्णयक्षमता
• मार्गदर्शिका •
वृषाली होनराव, पुणे
CSAT 55 Guide
रविवार, दि. 02 फेब्रुवारी 2020 ठिक 11 वा.
Call Now : 0231-2538777 / 2662123
9545387161

लोकमत
# हॅलो कोल्हापूर
शुक्रवार, दि. ३१ जानेवारी २०२०

AMVI (RTO) - वर्ग - ५ फेब्रु. सुरु
MPSC - वर्ग - ३ फेब्रु. सुरु
बँकींग - SBI/IBPS - सुरु झाली
एबी फौंडेशन
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

# सोनसळी किरणांचा अंबाबाईला अभिषेक

## किरणोत्सव : सलग दुसऱ्या दिवशी पूर्ण क्षमतेने दर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : थंडीचा ओसरलेला जोर, स्वच्छ वातावरण, मग मावळतीच्या सूर्यकिरणांना ढगांनीही वाट दिली. कोणत्याही अडथळ्यांची शर्यत पार न करता विनासायासपणे किरणे गुरुवारी थेट कोल्हापूरची करवीरनिवासिनी श्री अंबाबाईच्या गाभाऱ्यात पोहोचली आणि देवीला सुवर्णाभिषेक करून तिच्या चेहऱ्यावरच लुप्त झाली. प्रखर सूर्यकिरणांमुळे गेल्या काही वर्षांतील हा सर्वांत सुंदर आणि मनोहारी सोहळा झाला. किरणे लुप्त झाल्यानंतर सायंकाळी ६ वाजून १७ मिनिटांनी देवीची आरती आणि 'अंबामाता की जय'चा गजर करण्यात आला.

श्री अंबाबाईचा नोव्हेंबर महिन्यात दक्षिणायन आणि जानेवारी-फेब्रुवारी महिन्यांत उत्तरायण किरणोत्सव होतो. पाच दिवसांच्या किरणोत्सवात ठरलेल्या दिवसाच्या आधीच बुधवारी (दि. २९) सायंकाळी सुरू असलेल्या चाचणीदरम्यान पूर्ण क्षमतेने किरणोत्सव झाला. त्यामुळे गुरुवारीही असाच सोहळा 'याची देही, याची डोळा' पाहायला मिळणार याची खात्री असल्याने किरणोत्सवाच्या ( पान ४ वर)

### उत्तरायण दोन दिवस आधीच...

- मानवनिर्मित अडथळ्यांमुळे गेली काही वर्षे किरणोत्सव पूर्ण क्षमतेने होत नव्हता; तर नैसर्गिकरीत्या किरणोत्सव न होण्यात ढगाळ वातावरण, धुके आणि प्रदूषण हे घटक कारणीभूत ठरतात. दोन वर्षांपूर्वी किरणांच्या मार्गातील इमारतींचे अडथळे काढण्यात आले आहेत. थंडीत सूर्यास्त लवकर होत असला तरी सध्या थंडी कमी झाल्याने धुक्याचे प्रमाणही कमी आहे. त्यामुळे किरणांच्या प्रवासात कोणताही अडथळा आला नाही.
- अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार उत्तरायण किरणोत्सव दोन दिवस आधी, तर दक्षिणायन किरणोत्सव दोन दिवस नंतर होतो. यंदा ठरलेल्या तीन दिवसांच्या आधीच पूर्ण क्षमतेने किरणोत्सव झाला. आता पुढील चार दिवस किरणांचा प्रवास कसा होतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.


06 : 14 सूर्यकिरणांनी केलेला चरणस्पर्श


06 : 15 कमरेपर्यंत आलेली किरणे


06 : 16 गळ्यापर्यंत आलेली किरणे



### यंदाचे वेगळेपण...

किरणोत्सवाच्या मार्गातील अडथळे देवस्थान समिती व महापालिकेने काढल्यामुळे गेल्या दोन वर्षांत अंबाबाईचा किरणोत्सव पूर्ण क्षमतेने होत आला आहे. मात्र, यंदा त्याचे वेगळेपण असे की, सूर्यकिरणांची तीव्रता जास्त होती; म्हणजे किरणे अगदी लख्ख होती. त्यामुळे पूर्ण मूर्ती स्वच्छ सूर्यप्रकाशाने अगदी उजळून निघाली. त्यामुळे यंदाच्या किरणोत्सवाला एक वेगळी झळाळी लाभली.

श्री अंबाबाईच्या किरणोत्सवात गुरुवारी मावळतीच्या सोनेरी किरणांनी देवीची मूर्ती उजळून निघाली. यावेळी महाद्वारातून आलेल्या सूर्यकिरणांनी देवीचा गाभारा उजळून निघाला होता. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी भाविकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.


06 : 17 सूर्यकिरणे देवीच्या चेहऱ्यावर

आहार संघटनेतर्फे निवासी संगनम

# सोनसळी किरणांचा अंबाबाईला अभिषेक

( पान १ वरुन) एक तास आधीच भाविक मंदिराच्या परिसरात दाखल झाले होते.

सायंकाळी ५ वाजून ३६ मिनिटांनी मावळतीची सूर्यकिरणे महाद्वार कमानीतून मंदिरात आली. त्यानंतर गरुड मंडप, गणपती मंदिर, कासव चौक, पितळी उंबरा, पहिली पायरी, दुसरी पायरी, तिसरी पायरी, कटांजल असा प्रवास करीत ६ वाजून १४ मिनिटांनी किरणांनी देवीच्या मूर्तीचा चरणस्पर्श केला.

त्यानंतर टप्प्याटप्प्याने कमरेपर्यंत, गळ्यापर्यंत येऊन ६ वाजून १६ मिनिटांनी ती देवीच्या चेहऱ्यावर पोहोचली. स्वच्छ सूर्यप्रकाश आणि सोनेरी किरणांनी देवीच्या मूर्तीला अभिषेक घातला.

ढगाळ वातावरण, धुके असा कोणताही अडथळा नसल्याने देवीची मूर्ती उजळून निघाली. एक मिनिटभर किरणे देवीच्या मूर्तीवर स्थिरावली. नंतर किरिटावरून ती पुढे सरकत लुप्त झाली. यानंतर देवीची आरती करण्यात आली.

## सूर्यकिरणांचा प्रवास असा

| | वेळ | सूर्यकिरणांची तीव्रता (लक्समध्ये) |
|---|---|---|
| महाद्वार कमान | ५ वाजून ३६ मिनिटे | २५ हजार |
| गरुड मंडप चबुतरा | ५ वाजून ४४ मिनिटे | १६ हजार१०० |
| गणपती मंदिर | ५ वाजून ५५ मिनिटे | १० हजार १०० |
| कासव चौक | ६ वाजून ४ मिनिटे | ७ हजार १०० |
| पितळी उंबरा | ६ वाजून ५ मिनिट | ३ हजार ३९० |
| पहिली पायरी | ६ वाजून १० मिनिटे | ९०० |
| दुसरी पायरी | ६ वाजून ११ मिनिटे | ७०० |
| तिसरी पायरी | ६ वाजून १३ मिनिटे | ३४० |
| मूर्तीचा चरणस्पर्श | ६ वाजून १४ मिनिटे | ४४० |
| कमरेपर्यंत | ६ वाजून १५ मिनिटे | |
| गळ्यापर्यंत | ६ वाजून १६ मिनिटे | |
| चेहऱ्यावर | ६ वाजून १७ | |

*(एक मिनिट चेहऱ्यावर स्थिरावून लुप्त)*

आज सूर्यकिरणांची तीव्रता खूप चांगली होती, धुके किंवा ढगाळ वातावरण नव्हते; त्यामुळे किरणोत्सव प्रखरतेने झाला. किरणांची तीव्रता अशीच पुढे तीन दिवस राहिली तर हा सोहळा पूर्ण क्षमतेने होईल.

- प्रा. मिलिंद कारंजकर

# करवीर निवासिनीला सूर्यनारायणाचा अभिषेक

## सवाच्या पहिल्याच दिवशी किरणे अंबाबाईच्या मुखावर : गाभारा निघाला उजळून

तनिधी
ल्हापूर
ासिनी अंबाबाई
भारा गुरुवारी
उजळून निघाला.
झालेला पूर्ण
ाविकांना 'याचि
डोळा' अनुभवता
पाहण्यासाठी ५
भाविकांनी मंदिर
ी केली होती.
सिनी अंबाबाई
यण किरणोत्सव
गुरुवारी प्रारंभ
चा हा पहिलाच
णोत्सव सोहळा
आहे.


पहिल्याच दिवशी मावळतीची सूर्यकिरणे देवीच्या चेहऱ्यापर्यंत पोहोचली. ६७ सेकंद देवीच्या मुखावर किरणे स्थिर राहिली होती. यावेळी पडलेल्या मावळतीच्या किरणांनी गाभारा झळाळून निघाला होता.

### आजपासून तीन ठिकाणी स्क्रीन

किरणोत्सव सोहळा भाविकांना पाहता यावा यासाठी शुक्रवार ३१ पासून मंदिर परिसरात तीन ठिकाणी एलईडी स्क्रीन उभारण्यात येणार आहे, अशी माहिती प्रा. मिलींद कारंजकर यांनी दिली.

वर्षातून दोनवेळा अंबाबाई मंदिरात किरणोत्सव सोहळा होतो. दक्षिणायण किरणोत्सव सोहळा ९, १० व ११ नोव्हेंबर रोजी झाला. तर उत्तरायण किरणोत्सव सोहळा ३० जानेवारी ते २ फेब्रुवारीदरम्यान होत आहे. गुरुवारी उत्तरायण किरणोत्सव सोहळ्यास प्रारंभ झाला. किरणोत्सव सोहळ्यासाठी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने सर्व तयारी केली होती. किरणे परावृत होऊ नयेत यासाठी सायंकाळी कासव चौक ते पितळी उंबऱ्यापर्यंत सतरंजी अंथरण्यात आली होती. सायंकाळी पितळी उंबऱ्यापासून भाविकांना दर्शन बंद केले होते.

सूर्यकिरणांची तीव्रता प्रखर असल्याने पहिल्या दिवशी अंबाबाईच्या चेहऱ्यापासून ते किरीटापर्यंत ६७ सेकंद सूर्यकिरणे स्थिरावली होती, अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष महेश जाधव यांनी दिली.



**असा झाला सूर्यकिरणांचा प्रवास**

- सायं. ५.३६ वा. महाद्वार कमान
- सायं. ५.४५ वा. गरुड मंडप
- सायं. ५.५५ वा. गणेश मंदिर मागील बाजू
- सायं. ६.०४ वा. कासव चौक
- सायं. ६.०५ वा. पितळी उंबरा
- सायं. ६.१० वा. आतील पहिली पायरी
- सायं. ६.११ वा. दुसरी पायरी
- सायं. ६.१३ वा. कटांजल
- सायं. ६.१५ वा. देवीच्या खांद्यापर्यंत किरणे
- सायं. ६.१६ वा. मुखावर कि
- सायं. ६.१७ वा. किरिटापर्य
- किरणे पोहोचली.

THE TIMES OF INDIA, KOLHAPUR
SATURDAY, FEBRUARY 1, 2020

# Sun rays cover complete Mahalaxmi idol on 1st day

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The festival of rays (Kirnotsav) started from Friday, saw sun rays covering entire Mahalaxmi idol in its full glory at 6.17 pm at the temple.

The festival witnesses sun rays falling directly on the deity's idol at the time of sunset. This phenomenon takes place twice a year -- between November 9 and 11 and between January 31 and February 2.

## KIRNOTSAV

Milind Karanjkar, associate professor of astrophysics at the city-based Vivekanand College, who has undertaken a study of sun rays, its intensity and possible hurdles, said the idol saw ray intensity of around 35 lux in the sanctorum, which was more than enough to cover the deity's idol. The minimum intensity requirement is at least 15 lux.

"There were no pollutants or cloud cover, which would obstruct the rays. Hence, the festival witnessed one of the most beautiful views on Friday. The illegal constructions and obstacles removed consistently by the Pashcim Maharashtra Devsthan Samiti (PMDS) and the Kolhapur Municipal Corporation (KMC) played an important role," he said.

Rahul Gayakwad



The festival witnesses sun rays falling directly on the deity's idol at the time of sunset

According to the PMDS officials, for the devotees' convenience, LED screens have been installed at the Mahalaxmi temple premises, which will function throughout the festival. Hundreds of devotees witnessed the event live in the temple premises on Friday.

It has to be noted that hundreds of devotees crowd the temple to get a glimpse of the architectural marvel, where rays steadily reach the sanctorum of the temple on particular days of the year. The festival is celebrated when the sun rays fall directly on the deity's idol at the time of sunset.